स्वातंत्र्य सैनिकांना शासकीय खर्चाने पेन्शन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक:पीओअेस. १२८४/म.ऑ./विक१. स्वासै,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-११ जानेवारी, १९८४.

शासन निर्णय :

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:पीओअेस. १०७७. विक१. स्वासै, दिनांक ९.२.७८च्या शासन निर्णयात अंशत: फेरफार करून असा निर्णय घेण्यात आलेला आहे कीं, स्वातंत्र्य सैनिकांना/त्यांच्या अवलंबितांना राज्यशासनाकडून दिले जाणारे पेन्शन शासनाच्या खर्चाने मनीऑर्डरने पाठविले जावे याबरोबर असाही निर्णय घेण्यात आलेला आहे कीं, स्वातंत्र्य सैनिकांना प्रत्येक आर्थिक वर्षात प्रवासासाठी जो एकरकमी २००/-रुपये अनुदान दिले जाते तेही शासनाच्या खर्चाने मनीऑर्डरने पाठविले जावे. यावर होणारा खर्च "२८८-सामाजिक सुरक्षा व कल्याण [इ] इतर सामाजिक सुरक्षा व कल्याण कार्यक्रम, [सी], स्वातंत्र्य सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती इत्यादींना निवृत्ती वेतन [मागणी क्रमांक १४]"या अर्थसंकल्पीय शीर्षाखाली सोपविण्यांत आलेल्या नियत रकमेतून भागविण्यांत यावा.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६२/इएक्सपी-४, दि. ५.१.८४नुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[दा. प. कांबळे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य २, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सदस्य सचिव, उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन क्रमांक २५,
वित्त विभाग,
मुख्य संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, [योग्य ती प्रसिध्दी देण्यासाठी].
सर्व निवासी उपजिल्हाधिकारी व संबंधीत जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव समितीचे सचिव, [सर्व जिल्हा गौरव समितीच्या सदस्यांच्या नजरेस सदर शासन निर्णय आणण्या बाबत.]